| पंचायत समिती तलासरी | | | | |
|---|---|---|---|---|
| ग्रामपंचायत विभाग | | | | |
| अ.क्र. | योजनेचे नांव (वैयक्तीक/सामुहिक) | लाभार्थी निवडीचे निकष | लाभाचे स्वरुप | शासन निर्णय/परित्रका/पत्रा अन्वये तो संदर्भ क्रमांक व दिनांक |
| 1 | नागरी सुविधासाठी विशेष अनुदान (विद्युतीकरणासह) | 1. 5000 पेक्षा जास्त लोकसंख्या असणा–या ग्रामपंचायतीना आर्थिक,सामाजिक,सांस्कृतिक, औदयोगिक,कृषी औदयोगिक आणि वाणिज्यिक विकासासाठी अनुदान | 1.नियोजनबध्द विकास<br>2.बाजारपेठ विकास<br>3.सार्वजनिक दिवाबत्ती सोय<br>4.बागबगीचे,उद्याने तयार करणे<br>5.अभ्यास केंद्र | 1.शासन निर्णक क्रमांक–व्हीपीएम–2610/प्र.क्र. 121 /पंरा–4 दि. 16 सप्टेंबर, 2010. |
| 2 | लोकप्रतिनिधींनी सुचविलेली ग्रामीण भागातील गावांतर्गत रस्ते,गटारे व अन्य मुलभुत सुविधा | 1.लोकप्रतिनिधीनी सुचविलेल्या कामांबाबतचे मागणीपत्र | 1.गावांतर्गत रस्ते,गटारे, पाऊसपाणी निचरा,दहनभुमी व दफनभुमी सुधारणा करणे, संरक्षक भिंत,ग्रामपंचायत कार्यालयबांधकाम करणे,आठवडी बाजारासाठी सुविधा, गावामध्ये कचरा डेपोसाठी व प्राथमिक प्रक्रियेसाठी सुविधा,सार्वजनिक जागेत वृक्ष लागवड व त्यांचे संरक्षण | 1.शासन निर्णय क्र.विकास 2009/ प्र.क्र.193/प.रा.8 दि.3 मे, 2011.<br>2. शासन निर्णय क्र.विकास 2009/ प्र.क्र./पं.रा.8 दि.3 सप्टेंबर, 2014. |
| 3 | अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभुत/पायाभुत | 1. गावाची/ग्रामपंचायत क्षेत्रातील एकुण लोकसंख्या व | 1.कब्रस्थान/स्मशान/अत्यंविधीच्या जागेसाठी संरक्षक भिंतींसह सर्व | 1.शासन निर्णय क्रमांक:अविवि–2010/प्र.क्र.31/10/का.7, दि.14 मे, 2013. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सुविधा | अल्पसंख्याक प्रवर्ग निहाय लोकसंख्या आणि हाती घ्यावयाच्या विकासकामासंदर्भतील प्रपत्र – अ. | सुविधा | |
| | | 2. क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत विकासकाम हाती घेण्यास ग्रामसभेने मंजुरी दिलेल्या ठरावाची प्रत. | 2.सार्वजनिक सभागृह/शादीखाना हॉल | |
| | | 3. क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत हाती घ्यावयाच्या विकासकामाचे शाखा अभियंता,सार्वजिनक बांधकाम,पंचायत समिती यांनी साक्षांकित केलेले सविस्तर अंदाजपत्रक. | 3.सर्व नागरी/पायाभुत सुविधा उदा.पिण्याच्या पाण्याची सुविधा/विदयुत पुरवठा/इदगाह/ सांडपाण्याची व्यवस्था/रस्ते/ पथदिवे/सार्वजनिक स्वच्छतागृहे/ अंगणवाडी, बालवाडी केंद्र.इ. | |
| | | 4. क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत हाती घेंण्यात यावयाचे विकासकाम शासनाच्या अन्य तत्सम योजनेंतर्गत हाती घेण्यात आले नसल्याबाबतचे प्रमाणपत्र. | | |
| 4 | जनसुविधा योजना | 1. ग्रामपंचायतींना जनसुविधेसाठी विशेष अनुदान | 1.ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम रु.10,00,000/ मर्यादा | 1.ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.ददभु2010 / प्र.क्र.62/पंस-6 दि.16.09.2012 |
| | | | 2.स्मशानभुमी शेड,पोहोच रस्ता, कपाऊंड, चबुतरा,परिसर सुधारणा | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | स्मशानभुमी बांधकाम<br>महसुल गांव निहाय<br>रु.10,00,00/- मर्यादा | |
| 5 | 14 वा वित्त आयोग | 1. ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येचे प्रमाणानुसार 90% निधी प्राप्त होतो. | ग्रामपंचायत गाव विकास आराखडयानुसार अंमलबजावणी करणे. | 1.ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र-जीपीडीपी२०१५/प्र.क्र. 38/पं.रा-6 दि.04 नोव्हेंबर, 2015. |
| | | 1. ग्रामपंचायतीच्या क्षेत्रफळाच्या प्रमाणानुसार 10% निधी प्राप्त होतो. | | |
| 6 | स्मार्ट ग्राम योजना | मोठी ग्रामपंचायत, आदिवासी ग्रामपंचायत, शहरालगत असणारी ग्रामपंचायत व पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत या नुसार स्मार्ट या आधारावर गुणांकन पध्दतीनुसार सर्वाच्च गुण प्राप्त ग्रामपंचायत स्मार्ट ग्रामपंचायत म्हणून निवड करणे. | प्रथम स्तरावर पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत १०,००,०००/- रू, बक्षिस<br>दि्वतीय स्तरावर पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत 4 ०,००,०००/- रू, बक्षिस | ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासननिर्णय क्रमांक स्माग्रायो-२०१५/प्र.क्रं .१५१अ/योजना१/ दि. २१ नोव्हेंबर २०१६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना आदिवासी उपयोजनेअंतर्गत ५ टक्के निधी थेट देण्याबाबत. | अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायत आवश्यक | अ. पायाभूत सुविधा, ब. वनहक्क अधिनियम व पेसा कायदयाची अंमलबजावणी, क. आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, ङ.वनीकरण. वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन, व वन उपजिवीका या बांबीकरीता प्रत्येकी १/४ या प्रमाणात विनियोग करणे. | आदिवासी विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक पेसा–२०१५/प्र.क्रं.१९/का.१७ दि. २१ एप्रिल २०१५. |

**ग्रामपंचायतींना जन सुविधा योजने अंतर्गत विशेष अनुदान**

**योजनेचे स्वरुप माहिती**

जन सुविधा योजने अंतर्गत

(अ) ग्रामिण भागात दहन/ दफन भुमीची व्यवस्था करणे त्या सुस्थितीत ठेवणे व त्यांचे नियमन करणे यासाठी स्मशानभुमीवर हाती घ्यावयाची कामे दहन/दफन भुमी भुसंपादन,चबुत-यांचे बांधकाम,पोहोच रस्ता,गरजे नुसार कुंपन व भिती घालणे, विद्युतीकरण, आवश्यकते नुसार विद्युत दाहिनी, पाण्याची सोय, स्मृती उद्यान, स्मशान घाट जमिन सपाटीकरण व तळफरशी

(ब) ग्रामपंचायत भवन/ कार्यालय बांधकामे. यात ज्या गावांमध्ये ग्रा.प.इमारत नाही अश्या ठिकाणी सदर योजने अंतर्गत नवीन इमारत बांधकाम प्राधान्याने हाती घेण्यात यावे. या शिवाय जुन्या पडझड झालेल्या ग्रा.प. इमारतीची पुनरबांधर्णी अथवा विस्तार करणे, इमारती भोवती कुपंण घालणे, आवारामध्ये वृक्षारोपण करणे परिसर सुधारणा करणे

**योजनेत सहभागाच्या अटी / शर्ती / पात्रता**

१) या योजने अंतर्गत प्रत्येक कामास प्रशासकिय मान्यता ग्रामसभेच्या सहमती नंतर ग्रा.प. मार्फत घेण्यात यावी.
२) तांत्रिक मान्यता सक्षम अधिका-या मार्फत घेण्यात यावी.
३) अंदाजपत्रक व आराखडे नकाशे
४) देखभाल दुरुस्ती/ग्रामपंचायत हमीपत्रक व ग्रामपंचायत ठराव
५) सदर योजने अंतर्गत कामांची निवड जिल्हा नियोजन समिती मार्फत करण्यात येईल.
६) ज्या जागेवर बांधकाम करावयाचे आहे तेथील ७/१२ उतारा अथवा नमुना ८ जागेचा उतारा जागा
७) प्रस्तुत काम हे अन्य योजनेतुन प्रस्तावित किवा मंजुर नसल्या बाबत दाखला प्रमाणपत्र
८) प्रस्तावित जागेचा स्थळदर्शक नकाशा
९) गट विकास अधिकारी यांचे शिफारशी सह प्रस्ताव ग्रा.प. विभाग जिल्हा परिषद पालघर कडे सादर करण्यात यावा.

**योजनेचे स्वरुप माहिती**

मोठया ग्रामपंचायतींना नागरी सुविधासाठी विशेष अनुदान या योजने अंतर्गत बाजारपेठ विकास, सावजर्निक दिबाबत्तीची सोय, बागबगीचे, उद्याने तयार करणे, अभ्यासकेंद्र, गांवअंतर्गत रस्ते करणे व सांडपाणी व्यवस्थापनासाठी भुमीगत नाल्याचे बांधकाम करणे.

**योजनेत सहभागाच्या अटी / शर्ती / पात्रता**

१) या योजने अंतर्गत ग्रा.प. ने आराखडा तयार करुन त्यास ग्रामसभेची प्रशासकिय मान्यता घ्यावी. त्यानंतर मुख्य कायकार्री अधिकारी जि.प. यांची प्रस्तावास मान्यता घेण्यात यावी.
२) तांत्रिक मान्यता सक्षम अधिका-या मार्फत घेण्यात यावी.
३) अंदाजपत्रक व आराखडे नकाशे
४) देखभाल दुरुस्ती/ग्रामपंचायत हमीपत्रक व ग्रामपंचायत ठराव
५) जिल्हयातील ग्रा.प.चा प्राधान्य क्रम ठरविण्याचा अधिकार जिल्हा नियोजन मंडळाकडे असेल ज्या ग्रा.प.ची लोकसंख्या ५००० च्या वर आहेत व ज्या ग्रामपंचायती पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेत सहभागी होवुन त्या योजनेच्या निकषाची पुतर्ता केली असेल त्यामधुनच जिल्हा नियोजन मंडळ प्राधान्यक्रम ठरविल.
६) ज्या जागेवर बांधकाम करावयाचे आहे तेथील ७/१२ उतारा अथवा नमुना ८ जागेचा उतारा जागा
७) प्रस्तुत काम हे अन्य योजनेतुन प्रस्तावित किवा मंजुर नसल्या बाबत दाखला प्रमाणपत्र
८) प्रस्तावित जागेचा स्थळदर्शक नकाशा
९) गट विकास अधिकारी यांचे शिफारसशी सह प्रस्ताव ग्रा.प. विभाग जिल्हा परिषद पालघर कडे सादर करण्यात यावा.

**मा.लोकप्रतिनिधीनी सुचविलेल्या ग्रामिण भागातील गावांतर्गत रस्ते गटारे व अन्य मुलभुत सुविधा पुरविणे**

**योजनेचे स्वरुप माहिती**

मुलभुत सुविधा योजने अंतर्गत गावांतर्गत रस्ते, गटारे, पाऊसपाणी निचरा, दहनभुमी व दफनभुमीची सुधारणा करणे, संरक्षकभिंत ,ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम करणे, आठवडी बाजारासाठी सुविधा, गावांमध्ये कचरा डेपोसाठी व प्राथमिक प्रक्रियेसाठी सुविधा, सावजर्निक जागेत वृक्ष लागवड व त्यांचे संरक्षण करणे.

**योजनेत सहभागाच्या अटी / शर्ती / पात्रता**

१) तांत्रिक मान्यता सक्षम अधिका-या मार्फत घेण्यात यावी.
२) अंदाजपत्रक व आराखडे नकाशे
३) देखभाल दुरुस्ती/ग्रामपंचायत हमीपत्रक व ग्रामपंचायत ठराव
४) ज्या जागेवर बांधकाम करावयाचे आहे तेथील ७/१२ उतारा अथवा नमुना ८ जागेचा उतारा जागा
५) प्रस्तुत काम हे अन्य योजनेतुन प्रस्तावित किवा मंजुर नसल्याबाबत दाखला प्रमाणपत्र
६) सदर योजने अंतर्गत काम सुचविणे बाबत लोक प्रतिनिधी यांचे शिफारस पत्र
७) प्रस्तावित जागेचा स्थळदर्शक नकाशा
८) गट विकास अधिकारी यांचे शिफारसशी सह प्रस्ताव ग्रा.प. विभाग जिल्हा परिषद पालघर कडे सादर करण्यात यावा.

**पेसा कायदा-**

पेसा अंतर्गत ५% अबंध निधी सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षातसन २०११ च्या जनगणने नुसार दरडोई ४०६ रुपये पैकी ७०% नुसार २८४.८४ दरडोई ग्रामपंचातींना शासना मार्फत थेट वितरीत करणेत आला आहे.

सन २०१६-१७ ST Population च्या ६०१ प्रमाणे देय रक्कम आहे.

पेसा निधी हा शासन निर्णय २१ एप्रिल २०१५ च्या शासन निणयानुर्सार खर्च करण्याच्या सुचना प्राप्त झालेल्या आहेत. व त्या प्रमाणे ग्रामपंचायत स्तरावर तो खर्च करण्यात येत आहे.

सदर ख्र्च हा खालील प्रमाणे करण्यात याव्यात अशा सुचना निगर्मित करण्यात आल्या आहेत

**अ) पायाभूत सूविधा:**
**१.**संबधित पेसा गावातील ग्रामपंचायत कायालर्ये , आरोग्य केंद्रे,अंगणवाडी, शाळा, दफनभूमी ,गोडावून, गावांचे अंतर्गत रस्ते व तत्सम पायाभूत सूविधा
**ब)** वनहक्क अधिनियम(FRA) व पेसा (PESA)अंमलबजावणी:
**१.**आदिवासींनी त्यांच्या उदरनिवाहार्च्या व्यवसायाच्या संदर्भात प्रशिक्षण केंद्रांमार्फत प्रशिक्षण /मार्गदर्शन करणे.
**२.** गावतळी विकास किंवा मत्स्यपालन व्यवसाय/ मत्स्यबीज खरेदी.
**३.**सामाईक जमिनी विकसित करणे.
**४.**गौण पाणी साठयाचे व्यवस्थापन.
**५.**सामाईक नैसर्गिक साधनसंपदा व सामाईक मालमत्ता विकसित करणे.
**क)** आरोग्य , स्वच्छता ,शिक्षण.:
**१.** सावजर्निक स्वच्छतागृहे,बांधणे.
**२.**गावांमध्ये स्वच्छता राखणे.
**३.**सांडपाणी व्यवस्थेकरीता गटारे बांधणे व त्यांची देखभाल करणे.
**४.**शुध्द पिण्याचे पाणी पुरविणे.
**ड)** वनीकरण , वन्यजीवसंवर्धन,जलसंधारण,वनतळी,वन्यजीव पर्यटन व वन उपजिविका:

**ग्रामसभांनी कामाची निवड करणे म्हणजेच त्या कामास ग्रामसभेची प्रशासकिय मान्यता समजावी. ग्रामसभेने निवड केलेल्या रु.३ लक्ष पेक्षा कमी मुल्याच्या कामास स्वतंत्र तांत्रिक मान्यता आवश्यक असणार नाही** व रु.३ लक्ष पेक्षा अधिक मुल्य असलेल्या कामासाठी तांत्रिक मान्यता घेण्याची पध्दती परिच्छेद-४(६) प्रमाणे राहील.

*तसेच पेसा ५ % निधी ब व ड वरील खर्च करणे संदर्भात आदिवासी विभागाकडील दिनांक 20/02/2016 शासन निणर्या नुसार शुध्दीपत्रक निगर्मित करण्यात आलेल्या आहेत.

वन हक्क मान्यता अधिनियम 2005 च्या नियम 2008 च्या नियम 4(1)(e) नुसार समिती स्थापन पालघर जिल्हयात ७४८ गावांसाठी समित्या स्थपण करण्यात आलेल्या आहेत.